# राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

अपर मुख्य सचिव, (परिवहन) व अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मंत्रालयातील कार्यालयीन दालनात दिनांक ३१.०५.२०१६ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ह्यांच्या २५७ व्या बैठकीचे इतिवृत्त पुढे नमुद केल्याप्रमाणे आहे :

सदर बैठकीस रा.प.प्रा. चे पुढे नमुद केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुधिर श्रीवास्तव, भा.प्र.से.<br>अपर मुख्य सचिव (परिवहन),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| २. | श्री. श्याम वर्धने, भा.प्र.से.<br>परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ३. | श्री. सुरेंद्र पांडेय भा.पो.से.<br>अपर पोलिस महासंचालक (वाहतुक),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ४. | श्री. प्रसाद महाजन<br>अपर परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सचिव,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |

**बाब क्रमांक १ :-**

**विषय :- दिनांक २६.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई ह्यांच्या २५६ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.**

दिनांक २६.१०.२०१५ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २५६ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देऊन सदरहू इतिवृत्त प्राधिकरणाने कायम केले.

**बाब क्रमांक २ :-**

**विषय :- दिनांक २६.१०.२०१५ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांच्या २५६ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा प्राधिकरणानेआढावा घेणे.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने दि. २६.१०.२०१५ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण ह्यांच्या २५६ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेतला.

**बाब क्रमांक :- ०३**

**विषय मुंबई ते हैद्राबाद या आंतरराज्यीय मार्गासाठी कंत्राटी परवाना मिळणेबाबत श्री. पद्मनभा वि. शेट्टी व श्री. शेखर टी. शेट्टी यांच्या दि. १४.१२.२०१५ रोजीच्या अर्जावर विचार करण्याबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूची व महाराष्ट्र - आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये दिनांक ३०.११.१९९७ रोजी झालेल्या परस्पर वाहतूक कराराचा परिच्छेद II (A) चे अवलोकन केले व सखोल चर्चेअंती अर्जदार श्री. पद्मनभा वि. शेट्टी व श्री. शेखर टी. शेट्टी यांना मुंबई ते हैद्राबाद व्हाया पुणे, सोलापूर, उमरगाव, हुमनाबाद, जहिराबाद या मार्गासाठी राज्य परिवहन प्राधिकरण, आंध्र प्रदेश राज्य यांच्याकडून प्रतिस्वाक्षरी करुन घेण्याच्या अटीवर, पुढील पाच वर्षाकरिता एक-एक कंत्राटी परवाना मंजूर करण्याचा निर्णय घेतला.

राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र-आंध्रप्रदेश राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत शिल्लक फे-यांची माहिती विभागाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्याचे निर्देश दिले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र.०१/२०१६)**

**बाब क्रमांक:- ०४**

**विषय** **मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट-ए-कॅब स्किम १९८९ अंतर्गत मोटार कॅब्स भाडयाने देण्यासाठी शाखा कार्यालयाचे नवीन लायसन्स देणेबाबत- मे. फॉर्मुला कॉर्पोरेट सोल्युशन्स इंडिया प्रा. लि. यांचा दि. ३०.०३.२०१५ रोजीचा विनंती अर्ज**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूची व रेंट-ए-कॅब स्किम, १९८९ चे अवलोकन करुन सखोल चर्चा केली.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यांच्याकडून दिनांक २०.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अहवालानुसार अर्जदार मे. फॉर्मुला कॉर्पोरेट सोल्युशन्स इंडिया प्रा. लि., रेंट-ए-कॅब योजनेबाबतच्या अटी व शर्तींची पूर्तता करीत असून अर्जदारास रेंट-ए-कॅब-स्किम, १९८९ अंतर्गत लायसन्स मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

अर्जदारास रेंट-ए-कॅब-स्किम, १९८९ अंतर्गत मुख्य कार्यालयाचे लायसन्स प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, न्यु दिल्ली यांनी जारी केले असल्याचे व त्याची वैधता दिनांक २०.०५.२०१८ पर्यंत असल्याची प्राधिकरणाने नोंद घेतली.

सर्व बाबींचा विचार करुन राज्य परिवहन प्राधिकरणाने मे. फॉर्मुला कॉर्पोरेट सोल्युशन्स इंडिया प्रा. लि., ३०९, तिसरा मजला, मोर्या इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी पश्चिम, इंफिनिटी मॉल समोर, मुंबई-५३. यांना वाहन भाडयाने घेणाऱ्या व्यक्तीची ओळख तपासण्याची पुर्ण जबाबदारी रेंट-ए-कॅब योजनेअंतर्गत मंजुर लायसन्स धारकाची राहिल. तसेच, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, न्यु दिल्ली यांनी जारी केलेल्या लायसन्स बाबतची तसेच अर्जदार कंपनीच्या संचालक मंडळाच्या सदस्यांची पूर्वचारित्र्य पडताळणी करण्याच्या अटीवर अर्जदारास पाच वर्षाकरिता मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट-ए-कॅब स्किम १९८९ अंतर्गत शाखा कार्यालयाचे लायसन्स मंजूर करण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र. ०२/२०१६)**

**बाब क्रमांक :-०५**

**विषय :-** **मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट-ए-कॅब स्किम १९८९ अंतर्गत मोटार कॅब्स भाड्याने देण्यासाठी मुख्य कार्यालयाचे लायसन्स नुतणीकरन करण्याबाबत - मे ऑटो राईडर्स इंटरनॅशनल लि. मुंबई यांचा दिनांक १६.१०.२०१५ रोजीचा अर्ज.**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पश्चिम) व पनवेल यांच्या अहवालानुसार अर्जदार रेंट-ए-कॅब स्किम, १९८९ चा परिच्छेद क्र.५ मधील बाबींची पुर्तता करीत असून अर्जदारास योजनेअंतर्गत लायसन्स नुतनिकरण करण्यास शिफारस केली असल्याची नोंद घेतली. राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र यांनी अर्जदार मे. ऑटोरायडर्स इंटरनेशनल लि. ए-४, विकास सेंटर, एस.व्ही. रोड, सांताक्रुज (पश्चिम), मुंबई ४०० ०५४ यांचे मुख्य कार्यालयाचे लायसन्स क्र. ०४/रेंट-ए-कॅब लायसन्स/एसटीए/ १९९४ ची वैधता पुढील पाच वर्षाकरीता नुतनिकरण करण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र. ०३/२०१६)**

**बाब क्रमांक :-०६**

**विषय :- मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट ए कॅब स्किम १९८९ अंतर्गतमोटार कॅब्स भाडयाने देण्यासाठी मुख्य/शाखा कार्यालयाच्या लायसेन्सचे नुतनीकरण करणे बाबत- मे. ट्रॅव्हल टाईम कार रेन्टल प्रा.लि. यांचा दिनांक २८.०९.२०१५ रोजीचा अर्ज**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे व मुंबई (पूर्व) यांच्या अहवालानुसार अर्जदार रेंट-ए-कॅब स्किम, १९८९ चा परिच्छेद क्र.५ मधील बाबींची पुर्तता करीत असून अर्जदारास योजनेअंतर्गत लायसस्न नुतनिकरण करण्यास शिफारस केली असल्याची नोंद घेतली. राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र यांनी अर्जदार मे. ट्रॅव्हल टाईम कार रेन्टल प्रा. लि., ऑफीस नं.१०५, अॅस्ट्रल कोर्ट, एक्सीस बँकच्या पुढे, पुणे-४११ ००७ यांचे मुख्य कार्यालयाचे लायसन्स क्र. १४/रेंट-ए-कॅब लायसन्स/एसटीए/ २०१० ची वैधता पुढील पाच वर्षाकरीता नुतनिकरण करण्यास मान्यता दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र. ०४/२०१६)**

**बाब क्रमांक :-०७**

**विषय :- फ्लीट टॅक्सी / फोन फ्लीट टॅक्सी योजनेअंतर्गत कार्यरत वाहनांचा भाडेदर कमी करण्यासंदर्भात मे. मेरु कॅब कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांचा दिनांक १८.१०.२०१५ रोजीचा अर्ज.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले व सखोल चर्चेअंती फ्लीट टॅक्सी योजनेंतर्गत कार्यरत वाहने हे वातानुकूलित असल्याची नोंद घेतली. तसेच मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण ह्यांच्या दि. ११.०५.२०१५ रोजीच्या बैठकीत कूल कॅबचे भाडे पहिल्या १.५ कि.मी. साठी रु. २८/- व पुढच्या प्रत्येक

कि.मी. साठी रु. १८.५५/- असे निश्चित केल्याची नोंद घेतली. फ्लीट टॅक्सी योजनेंतर्ग मे. मेरु कॅब कंपनी प्रा.लि. यांच्या कार्यरत वाहनांचे भाडेदर कमी केल्याने (Consumer Benefit) प्रवाशांच्या फायद्याचा विचार करुन मे. मेरु कॅब कंपनी प्रा. लि. यांना पुढील सहा महिन्यांपर्यंत प्रायोगिक तत्वावर मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण ह्यांनी कुल कॅब संवर्गात कार्यरत वाहनांसाठी लागू केलेले किमान भाडेदरापेक्षा कमी नाही असे किमान भाडेदर लागू करण्यास परवानगी दिली.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र. ०५/२०१६)**

**बाब क्रमांक :-०८**

**विषय :-** **महाराष्ट्र मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र छत्तीसगढ राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत आंतरराज्यीय मार्गांवर टप्पा परवाने मंजूर करणेबाबत जाहिरात देऊन अर्ज मागविण्याबाबतची अट रद्द करण्याबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले व सखोल चर्चेअंती महाराष्ट्र मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र छत्तीसगढ राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत आंतरराज्यीय मार्गांवर टप्पा परवाने मंजूर करणेबाबत जाहिरात देऊन अर्ज मागविण्याबाबतची अट कायम ठेवण्याचा निर्णय घेतला.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र. ०६/२०१६)**

**बाब क्रमांक :-०९**

**विषय :-** **महाराष्ट्र मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र छत्तीसगढ राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत आंतरराज्यीय मार्गांवर टप्पा परवाने मंजूर करणेबाबत जाहिरात न देता परवान्यांसंदर्भात केलेली कार्यवाही नियमित करणेबाबत.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन करुन विषयसूचीतील परिशिष्ट अ व ब मधील प्रकरणांमध्ये परिवहन आयुक्त यांनी प्रकरणनिहाय तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह राज्य परिवहन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

महाराष्ट्र मध्यप्रदेश तसेच महाराष्ट्र छत्तीसगढ राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत आंतरराज्यीय मार्गांवर उपलब्ध फे-या/परवान्यांकरिता टप्पा परवाने मंजूर करणेबाबत जाहिरात देऊन अर्ज मागवण्याचे निर्देश

प्राधिकरणाने दिले व त्याअनुषंगाने प्राप्त अर्ज व परिशिष्ट क मध्ये नमूद अर्जांवर राज्य परिवहन प्राधिकरणाने यापूर्वी ठराव क्र. २५/२०११ व १३/२०१३ अन्वये निश्चित केलेले निष्कर्षानुसार अर्जांवर कार्यवाही करण्याचा निर्देश दिले. प्राधिकरणाने असेही निर्देशित केले की, परिशिष्ट क मध्ये नमूद अर्जदारांना त्या मार्गांसाठी फेरअर्ज दाखल करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक ३१.०५.२०१६ ठराव क्र. ०७/२०१६)**

**प्रल्हाद महाजन**
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथाअपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्याम वर्धने, (भा.प्र.से)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**सुरेंद्र पांडेय,(भा.पो.से)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथा अपर पोलीस महासंचालक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**सुधीर श्रीवास्तव, (भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथाअपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**